नि.फौ.ख.नं.२०८/२०१९

निशाणी क्र.३१

**सरकारतर्फे साक्षीदार क्र.२ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करते की,

**माझे नाव – बाळू पांडूरंग सावंत ,**

वय - ४६ वर्षे, व्यवसाय – व्यापार,

रा. वालचंदनगर, रत्नापूर, ता.इंदापूर, जि.पुणे.

**<u>सरतपास सरकारतर्फे सहा.सरकारी अभियोक्ता श्री.एस.एस.भांडारकर यांच्यामार्फत शपथेवर सुरु -</u>**

१. घटना दि.१९/०४/२०१९ रोजी सकाळी ११ वाजता अकोले गावात ग्रामपंचायत समोर घडली. तेथे मी व माझी पत्नी सुषमा आम्ही घड्याळ, बेल्ट व गॉगलचे दुकान लावले होते. त्यादिवशी एक माणूस आमच्या दुकानात आला व त्याने त्याला लहान मुलांचे घड्याळ हवे आहे असे सांगितले. (साक्षीदाराने तो माणूस म्हणजेच आरोपी असल्याचे न्यायालय कक्षात मागे बसलेल्या आरोपीकडे बोट करुन सांगितले). त्याने "घड्याळ कितीला आहे" असे मला विचारले. मी त्याला घड्याळाची किंमत ३० रुपये असल्याचे सांगितले. त्याने ३ घड्याळे घेतली. त्यावेळी मी त्याच्याकडे ९० रुपये मागितले. तो म्हणाला घड्याळ एवढ्या किंमतीला नाहीत. मी तुम्हाला ६० रुपये देतो असे तो म्हणाला. मी त्याला म्हटले "एवढ्या किंमतीला घड्याळ येत नाही”. त्यावेळी त्याने घड्याळ ठेवले. त्यावेळी त्याने एक घड्याळ उचलले व मला म्हणाला हे घड्याळ २० रुपयाला द्यावे लागेल. मी त्याला नाही म्हटल्यावर त्याने अरेरावीची भाषा सुरु केली. तो म्हणाला आमच्याच गावात येऊन महाग घड्याळे विकत आहात. त्यावेळी माझी पत्नी त्याला म्हटली तुला घड्याळ घ्यायचे नसेल तर घेऊ नको, पण शिवीगाळ करु नको. आरोपीने शिवीगाळ करुन कालवा केला. त्यानंतर तो तेथुन निघुन गेला.

२. त्यानंतर १५ मिनीटांनी आरोपी बांबूची काठी घेऊन आला. त्याने ती काठी माझ्या पत्नीच्या डोक्यात व हातावर मारली. मी मध्ये पडल्यावर त्याने माझ्या हाता-पायावर काठी मारली. त्याने माझ्या दुकानाची तोडफोड केली. लोकांनी त्याला धरले व हाकलून लावले. त्याने दुकान लावले तर जिवे मारण्याची धमकी दिली. लोकांनी आम्हाला आरोपीचे नाव राजेंद्र आव्हाड असल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही दुकान बंद करुन भिगवण पोलिस ठाणेत गेलो.

३. पोलिसांनी आम्हाला दवाखान्यात जायला सांगितले म्हणून आम्ही भिगवण सरकारी दवाखान्यात गेलो. त्यानंतर आम्ही तक्रार दिली.

**४.** ज्या बांबूच्या काठीने मला मारहाण झाली ती काठी दाखविल्यास मी ओळखू शकते. (साक्षीदारास जमा मुद्देमाल नं.१८/२२ मधील काठी दाखविली. साक्षीदाराने त्याच काठीने त्याला मारहाण झाल्याचे सांगितले.) काठी **वस्तु-अ** येथे आहे.

**सरतपास पुर्ण.**

**आरोपीतर्फे देण्यात आलेला निशाणी ३० वरील मुदतीचा अर्ज नामंजूर झाल्याने उलटतपास नाही असा आदेश पारीत करण्यात आला.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by PRAJKTA RAJEEV SABNIS
Date: 2026.04.02 17:59:52 +0530

**(प्राजक्ता राजीव सबनीस)**

**दि.०२/०४/२०२६**

**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, इंदापूर,**
**ता.इंदापूर, जि.पुणे.**